# औरंगाबाद जिल्हा व प्रमुख पिकाखालील क्षेत्राचा भौगोलीक अभ्यास

**पाथ्रीकर संदीप राधाकिसन**
संशोधक विद्यार्थी मु.पो.पाथ्री, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद

**सारांश:** सजीवांना जगण्यासाठी हवा, पाणी, अन्न लागत असते. मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या जीवन जगण्यासाठी आवश्यक त्या गरजा पूर्ण करण्यासाठी "कृषी" किंवा "शेती" या व्यवसायाचा उपयोग होतो.

भारतातील जवळपास 3/4 जमीन खाद्य पीकांखाली असल्यामुळे खाद्य पीकाखाली असलेले पीकच प्रमुख पिक म्हटल्या जाते. खाद्य पीकांखाली असलेल्या पीकांनाच प्रमुख म्हटल्या जाईल. ज्या प्रदेशात किंवा क्षेत्रात पाणी पूरवण्याच्या सोयी जास्त आहे किंवा कृत्रिम पाणीपूरवठयाची म्हणजेच जलसिंचनाची उपलब्धता योग्य प्रमाणात आहे. अशा ठिकाणी प्रामुख्याने जी पीके घेतली जातात त्यांनाच प्रमुख पीक असे म्हणतात.

***प्रस्तावना :***

***संशोधन अध्ययनाचे महत्व :–***

मानवाच्या मुलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा यापैकी अन्न व वस्त्र या दोन गरजा कृषींवर अवलंबून आहेत. भारतातील प्रचंड वाढती लोकसंख्या बघता त्यांच्या उपजीवीकेसाठी भारतात मोठया प्रमाणावर खाद्य पीकांची लागवड केली जाते. भारतात सुमारे $75^3$ खाद्य पीकांची लागवड केली जाते. त्यामुळे व्यापारी पीकांचे प्रमाण भारतात कमी असते.

भारतात मात्र तांदुळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका, बार्ली, हरभरा, ऊस, फळे इतर कडधान्य ही प्रमुख खाद्य पिके आहेत.

***बीजसंज्ञा :–***

औरंगाबाद जिल्हा, शेती विकास, प्रमुख पिक व त्याखालील क्षेत्र.

***संशोधनाची उद्दिष्टे :–***

1)औरंगाबाद जिल्हाची भौगोलिक माहिती अभ्यासणे.
2) अभ्यास क्षेत्रातील शेती विकास समजून घेणे.
3)अभ्यास क्षेत्रातील प्रमुख पीकांवर प्रकाश टाकणे.
4)अभ्यास क्षेत्रातील खाद्य पीकाखालील क्षेत्र अभ्यासणे.
5)अभ्यास क्षेत्रातील प्रमुख पीकांच्या उत्पादन वाढीसाठी उपाययोजना सुचविणे.

***संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :–***

सदर शोध निबंध हा महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद जिल्हयाशी संबंधीत असून यात 1995 ते 2001 या कालावधीतील वर्षातील शेती विकास, खाद्य पीक व त्याखालील क्षेत्र, उत्पादन वाढ यांचा भौगोलीक अभ्यास करण्यात आलेला आहे. हा शोध निबंध महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद जिल्हया पूरताच मर्यादीत आहे.

***संशोधनाचे अभ्यास क्षेत्र :–***

प्रस्तुत शोध निबंधासाठी भारतातील महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद जिल्हयाची निवड करण्यात आलेली आहे. औरंगाबाद हे एक ऐतिहासिक शहर असून मराठवाडयाची राजधानी आहे. त्याला 52 दरवाजे आहे. त्याची अजून एक ख्याती म्हणजे 52 दरवाज्याचे शहर व अजिंठा, वेरुळ लेण्यांचा जिल्हा म्हणून त्याला ओळखले जाते. औरंगाबाद हा जिल्हा महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारण मध्य भागात असून औरंगाबाद जिल्हयात एकूण 9 तालूके आहेत. औरंगाबाद जिल्हयाची लोकसंख्या 28,99,013 असून क्षेत्रफळ 10,000 चौ.की आहे. भौगोलीक स्थान 190 53′ 47″ उत्तर 750 23′ 54″ पूर्व आहे.

जिल्हयाच्या उत्तर भागात सातमाळा डोंगररांगा व अजिंठा डोंगररांगा पूर्व–पश्चिम पसरल्या आहेत. जिल्हयाच्या दक्षिण भागात सातारा डोंगर तर पूर्व भागात चौक्याचे डोंगर पसरले आहेत. जिल्हयाच्या मध्यवर्ती भागात वेरुळच्या टेकडया असून दक्षिण भागात गोदावरीचे मैदान आहे. गोदावरी ही औरंगाबाद जिल्हयाची प्रमुख नदी असून या नदीवर जायकवाडी हे सर्वात मोठे धरण आहे. त्याला "नाथसागर" असे म्हणतात. या जलाशयातील पाण्याचा वापर पिण्यासाठी, शेतीसाठी, विद्युत निर्मितीसाठी व कारखान्यासाठी केला जातो.

औरंगाबाद जिल्हयातील उत्तरेकडील जमीन हलकी व मुरमाड असून दक्षिणेकडील गोदावरी काठची जमीन काळी कसदार, सुपीक आहे. कापूस व ऊस यांसारखी व्यापारी पिके येथे घेतली जातात.

***शेती व्यवसाय :–***

औरंगाबाद जिल्हयाचे हवामान उष्ण व कोरडे असून खरीप हंगामात बाजरी पीक जिल्हयाच्या सर्वच भागात घेतले जात असल्यामुळे याला जिल्हयातील प्रमूख पीक म्हणतात. जसे मका, ज्वारी, कापूस, कडधान्य, भूईमुग इ.

रबी हंगामात गहू, ज्वारी आणि हरभरा ही पीके घेतात. उसाचे उत्पादन फुलंब्री तालूक्यात जास्त होते. अलीकडे औरंगाबाद जिल्हयातील फलोत्पादन क्षेत्रात वाढ होत आहे. फुलंब्रीचे आंबे, द्राक्षे इ. द्राक्ष उत्पादनात फुलंब्री तालूक्यातील पाथ्री येथील श्री.राधाकिसन सुर्यभान पाथ्रीकर यांचे नाव आघाडीवर येत आहे. त्यांनी सुरुवात करुन द्राक्ष पीक घेवून ते यशस्वीही करुन दाखविले व औरंगाबाद मधील ब–याच व्यापार पेठेत तसेच बाहेरच्या राज्यात तेथील द्राक्षाला मागणी आहे. तसेच दौलताबादचे सीताफळ, पेरु, अंजीर प्रसिद्ध आहे. औरंगाबाद जिल्हयाचा पूर्व भाग डोंगराळ प्रदेश असल्यामुळे तेथे पावसाचे प्रमाण जास्त असून पश्चिमेकडे पावसाचे प्रमाण कमी कमी होत जाते. औरंगाबादेतील हिमरुशाली, पैठणी प्रसिद्ध आहे. तसेच प्राचीन पारंपारिक कलेचा वारसा जपणारा जिल्हा आहे. जिल्हयात संगीत, शिल्पकला, चित्रकला इत्यादी कला जगप्रसिदध आहे.

***संशोधन पद्धती व माहिती स्त्रोत :–***

सदर प्रस्तुत शोध निबंधासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धती, नमुना निवड पद्धती तसेच दुय्यम स्त्रोत वापरुन त्यात प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, लेख, ग्रंथ, द्रक–आव्य माध्यम बातम्या, मासिके व औरंगाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 1994 पासून 2001 पर्यंतच्या साहित्याचा पाहीजे त्या प्रमाणात व अनुभवानुसार वापर करुन सादरीकरण करण्यात आले आहे.

***विषय विवेचन :–***

***औरंगाबाद जिल्हयातील प्रमूख पीकाखालील क्षेत्र :–***

महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पीकाखालील क्षेत्राचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, ब–याचश्या पीकाखालील क्षेत्रात वाढ झालेली आहे. तर काही पीकाखालील क्षेत्रात घट झाल्याचे दिसून येते. कापूस, हरभरा, बाजरी, मका, गहू या पिकांच्या क्षेत्रात वाढ होतांना दिसत आहे तर भूईमुग, ऊस, कडधान्य या सारख्या पिकांच्या क्षेत्रात घट (कमी) होत आहे. यावरुन असे समजते की व्यापारी पीकांच्या क्षेत्रात वाढ होत असून अन्न धान्याच्या पीकाखालील क्षेत्रात घट होत आहे.

***औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पिकाखालील क्षेत्र दर्शविणारे कोष्टक (दर हेक्टरमध्ये)***

| अ.क्र. | पीक | 1994–95 | 95–96 | 96–97 | 97–98 | 99–2000 | 2000–01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | तादूळ | 1555 | 1248 | 1446 | 1502 | 1300 | 485 |
| 2 | गहू | 36920 | 40175 | 37056 | 37719 | 51500 | 29549 |
| 3 | ज्वारी | 283748 | 234971 | 256891 | 234151 | 212100 | 238824 |
| 4 | बाजरी | 177481 | 190706 | 174958 | 148409 | 133000 | 137371 |
| 5 | मका | 40546 | 14072 | 40794 | 42195 | 45400 | 77869 |
| 6 | ऊस | 38818 | 21532 | 19141 | 12495 | 18500 | 11314 |
| 7 | कापूस | 85341 | 74666 | 107457 | 162630 | 156000 | 141296 |
| 8 | भूईमुग | 15662 | 15058 | 14454 | 13875 | 13600 | 5915 |
| 9 | हरभरा | 38142 | 34401 | 38307 | 41306 | 48500 | 41548 |
| 10 | एकूण कडधान्य | 149106 | 101544 | 125029 | 106623 | 123900 | 104481 |
|  | एकूण | 867319 | 728373 | 815533 | 800925 | 803800 | 788652 |

***आधार :– जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद***

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख पीकाखालील क्षेत्र 1994–95 मध्ये 867319 दर हेक्टरी इतके होते. परंतू नंतर मात्र प्रमूख पीकाखालील क्षेत्र काही टप्प्यात कमी–कमी होत जावून 2000–01 मध्ये 788652 दर हेक्टरी पीकाखालील क्षेत्रात कमी दिसून येते.

1994 ते 2001 च्या कालावधीतील अभ्यासावरुन असे दिसून येते की, कापूस, बाजारी, मका, हरभरा, गहू, ज्वारी या पीकांमधील क्षेत्रात क्रमानूसार वाढ होतांना दिसते. तर दूसरीकडे भूईमुग, ऊस, तांदूळ, एकूण कडधान्य या पीकाखालील क्षेत्रात सातत्याने कमी होतांना दिसत आहे. संबंधीत कालावधीमध्ये कापूस या पीकाखालील क्षेत्रात तर झपाटयाने वाढ झाल्याचे दिसून येते. हे व्यापारी पीक असल्याकारणाने व एकरी उत्पादन हरित क्रांतीमूळे किंवा तंत्रज्ञानाच्या सहायाने वाढत असल्यामूळे या पिकांच्या क्षेत्रात वाढ होत असावी. तर त्या खालोखाल बाजरी, मका, हरभरा, गहू, ज्वारी या पिकांचाही समावेश होतो. गहू व ज्वारी हे दोन पिकांमध्ये संबंधीत काळात बराचसा चढ उतार बघायला मिळतो. दर हेक्टरी क्षेत्रात 1994 मध्ये 85341 होते ते 2000–2001 मध्ये 141296 इतके झपाटयाने वाढले. तसेच भूईमुग या पीकाखालील क्षेत्रात संबंधीत काळात सर्वात जास्त घट झाल्याचे दिसून येते. 1994 मध्ये भूईमुगाखालील क्षेत्र 15661 दर हेक्टर इतके होते ते 2000–2001 मध्ये 5915 इतके घसरले. त्या खालोखाल ऊस, तांदूळ, एकूण कडधान्य यांचे प्रमाण झपाटयाने खाली आलेले दिसून येते. फळबागातील उत्पादनात चढ उतार दिसून येत आहे.

***निष्कर्ष :–***

औरंगाबाद जिल्हा व तेथील प्रमूख पिकाखालील क्षेत्राच्या अभ्यासावरुन असे लक्षात येते की, औरंगाबाद हा जिल्हा एक ऐतिहासिक ठिकाण असून जिल्हयाच्या उत्तर, दक्षिण, पूर्व या तिन्ही बाजूंनी डोंगर रांग असून एक भाग मैदानी आहे. तसेच येथे बाजरी हे पीक प्रमूख पीक म्हणून घेतात. तसेच फलोत्पादनातही औरंगाबादची वाटचाल होतांना दिसत आहे. प्रमूख पिकांखालील क्षेत्राच्या अभ्यासावरुन लक्षात येते की कापूस, बाजरी, मका, हरभरा, गहू, ज्वारी या पीकांखालील क्षेत्रात झपाटयाने वाढ झाल्याचे दिसून येते. यातील बरेचसे प्रमूख पीके आहेत व वाढत्या लोकसंख्येच्या उपजीविकेसाठी ही पीके मोठया प्रमाणात घेतल्या जात असावी व या पिकाखालील क्षेत्रात संबंधीत काळात वाढ झाल्यामूळे जास्तीत जास्त जमीन पीकाखाली आलेली असून कृषीचा विकास झपाटयाने झालेला आहे.

औरंगाबाद जिल्हयामध्ये खाद्य पीकांच्या व्यतिरिक्त व्यापारी पीकांच्या बाबतीत 1994 ते 2001 दरम्यान विक्रमी वाढ झालेली दिसून येते. परंतू खाद्य किंवा व्यापारी पीकांच्या क्षेत्र वाढीवर किंवा कमतरतेवर येथील जमिन, हवामान, पाणी यांचे नियोजन याचाही मोठया प्रमाणावर परिणाम झालेला दिसून येतो. ज्या भागात या गोष्टी मोठया प्रमाणावर आहेत तेथील जास्तीत जास्त जमीन या पीकाखाली आलेली आहे.

एकंदरित स्थितीचा आढावा घेतल्यास भविष्यामध्ये खाद्य पीकाच्या तुलनेत व्यापारी पीकांच्या क्षेत्रातही मोठया प्रमाणावर वाढ होवू शकते, तसेच फलोत्पादनात औरंगाबाद हा जिल्हा मागे असल्यामूळे व येथील ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी शासनाने भविष्यात काही उपाययोजना, जनजागृती, आर्थिक मदत करणे आवश्यक आहे.

***संदर्भ :–***

1)महाराष्ट्राचा भूगोल – डॉ.पांडूरंग केचे
2)औरंगाबाद जिल्हा आर्थिक, सामाजिक समालोचन
3)अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
4)कृषी भूगोल – डॉ.प्रकाश सावंत (फडके प्रकाशन – कोल्हापूर)
5)भारत का ब्रहत भूगोल – डॉ.चतुर्भूज मामोरिया
6)महाराष्ट्राचा भूगोल – प्रा.पाटील टी.बी.
7)जिल्हाधिकारी कार्यालय – औरंगाबाद
8) www.google.com
9)www.yahoo.com